महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन

**कार्यालय, प्रकल्प अधिकारी**

**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प भामरागड जि.गडचिरोली**

**दुरध्वनी क्रं-** 07134-295050 कार्यालयीन शासकिय इमारत, आरेवाडा रोड, भामरागड जि. गडचिरोली - 442710

**E-mail** - pbhamragad@gmail.com / poitdp.bgad-mh@gov.in

| **जा.क्र-भांडार-2025/भाजीपाला/प्र.क्र.0126/का.7(1)/** 124 | **दिनांक :-** 06.01.2026 |
|---|---|

**दरपत्रक सुचना पत्र**

प्रति,

1) कार्यालयाचे नोटीस बोर्ड
2) --------------------------------

**विषय:- शासकिय आश्रमशाळांना सन 2025-26 मधील उर्वरित सत्राकरीता भाजीपाला, अंडी, केळी व मटन/ चिकन पुरवठा करणेकरीता दरपत्रके सादर करणेबाबत..**

**संदर्भ:-** मा. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर यांचे पत्र क्रमांक शाआशा/लेखा-2025-26/प्र.क्र.05/का-5(6)/07 दि. 01.01.2026

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, मा. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर यांचे संदर्भीय पत्रान्वये मागील सत्राच्या पुरवठा आदेशास 6 महिने मुदतवाढ देण्यात आल्याने नव्याने मुदतवाढ देणे शक्य नसल्याने पुढिल निर्देशापर्यंत तात्पुरत्या स्वरुपात प्रकल्प स्तरावरुन भाजीपाला, अंडी, केळी व मटन/चिकण पुरवठ्याची व्यवस्था प्रकल्प स्तरावरुन करण्यात यावे असे कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार शासकीय आश्रमशाळांना सन 2025-26 मधील उर्वरित सत्राकरीता प्रकल्प स्तरावरुन सदर बाबींकरीता दरपत्रके मागवुन खरेदी करण्याचे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

त्यानुसार सन 2025-26 या शैक्षणिक वर्षातीत उर्वरित सत्राकरीता प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प भामरागड जि. गडचिरोली यांचे अंर्तगत चालविण्यात येणाऱ्या शासकिय आश्रमशाळांना भाजीपाला, अंडी, केळी व मटन/ चिकन पुरवठा करणेकरिता ईच्छुक पुरवठाधारकांकडुन खालील तपशिलाप्रमाणे नमुद अटी व शर्तीचे अधिन राहुन आश्रमशाळानिहाय दरपत्रके मागविण्यात येत आहे. तरी ईच्छुक दरपत्रकधारकांनी दिनांक 01.01.2026 ते 13.01.2026 पर्यंत सायंकाळी 6.15 वाजेपर्यंत सिलबंद लिफाफ्यात आश्रमशाळानिहाय दरपत्रके सादर करावे.

| अ. क्र. | भाजीपाला व इतर साहित्याचे नावे | साहित्याचे तपशिल | परिमाण | दर (सर्व करांसह व खर्चासह) |
|---|---|---|---|---|
| 1. | बटाटे | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 2. | वांगे | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 3. | फुलगोबी | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 4. | पत्ता गोबी | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 5. | चवळीच्या शेंगा | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 6. | वाल शेंगा | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 7. | शिमला मिरची | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 8. | कोहळा | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 9. | ढेमसे | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 10. | लवकी /दुधी | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 11. | फणस | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 12. | दोडके | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 13. | पडवळ | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 14. | कारले | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 15. | तोंडरे | उत्तम प्रतीचा | 1 kg | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 16. | भेंडी | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 17. | गवार शेंगा | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 18. | वटाणा शेंगा | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 19. | शेवगा शेंगा | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 20. | चवळी भाजी | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 21. | मेथी भाजी | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 22. | पालक | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 23. | कांदे | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 24. | टमाटर | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 25. | हिरवी मिरची | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 26. | लसुन | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 27. | अद्रक | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 28. | सांभार | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 29. | गाजर | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 30. | मुळा | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 31. | काकडी | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 32. | निंबु | उत्तम प्रतीचा | **1 nos** | |
| 33. | बिट | उत्तम प्रतीचा | 1 kg | |
| 34. | अंडी | मध्यम आकाराचे | **1 nos** | |
| 35. | केळी | मध्यम आकाराची | 1 Dozen | |
| 36. | मटन | बकरा मटन, उत्तम प्रतीचे | 1 kg | |
| 37. | चिकण | बॉयलर, उत्तम प्रतीचे | 1 kg | |
| 38. | लाडु (बुंदीचे लाडू) | बेसन / बुंदीचे लाडू | 1 kg | |
| 39. | श्रीखंड | उत्तम प्रतीचे | 1 kg | |
| 40. | गुलाबजाम | उत्तम प्रतीचे | 1 kg | |
| 41. | रसगुल्ला | उत्तम प्रतीचे | 1 kg | |
| 42. | जलेबी | उत्तम प्रतीचे | 1 kg | |

**अटी व शर्ती:-**

1) या कार्यालयाच्या अधिनिस्त खालील प्रमाणे आश्रमशाळा कार्यरत आहेत.
   **1. जारावंडी, 2. कसनसूर, 3. हालेवारा, 4. तोडसा, 5. जांबिया, 6. ताडगाव, 7. कोठी, 8. लाहेरी**
   आपण पुरवठा करण्यास ईच्छुक असलेल्या आश्रमशाळेकरीता वेगवेगळे दरपत्रक सादर करावे लागेल. दरपत्रक सादर करतांना त्यावर आश्रमशाळेचे नाव नमुद करणे आवश्यक राहिल.
2) **दरपत्रकासोबत पुढिल प्रमाणे कागदपत्रे जोडावे लागेल- कृषि उत्पन्न बाजार समितीचा वैध परवाना, पॅन (PAN ) कार्ड, बँक पासबुक / चेक बुक ची प्रत, मागील वर्षाचे आयकर (Income Tax) विवरणपत्रे (Assessment Year 2025-26), अनुभव प्रमाणपत्रे, केंद्रशासन अथवा राज्यशासन यांचे कडून कधीही काळया यादीत टाकण्यात आली नाही तसेच कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र, अन्न सुरक्षा व मानक कायदा 2006 यांचे अंतर्गत प्रदान करण्यात आलेली अनुज्ञप्ती/प्रमाणपत्र औषधे प्रशासन यांचे वैध नोंदणी प्रमाणपत्र.**
3) ईच्छुक असणाऱ्या निविदाधारकास एका आश्रमशाळेकरीता केवळ एकच दरपत्रक सादर करता येईल.
4) निविदाधारकाला सादर करावयाचे दरपत्रक अधिकृत लेटरहेडवर सही व शिक्यासह सिलबंद लिफाफ्यात सादर करणे बंधनकारक आहे.सोबत वर दिल्याप्रमाणे कागदपत्रे दरपत्रकासोबत जोडण्यात यावे.
5) वर नमुद केल्यानुसार दिलेल्या मुदतीत दरपत्रके सादर करावे लागेल. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.
6) दरपत्रकात दर सादर करतांना साहित्यांचे दर सर्व खर्चासह व करांसह नमुद करण्यात यावे.
7) भाजीपाला, अंडी, केळी व मटन/चिकण/फिशचा पुरवठा आदेश प्राप्तीपासुन ते सत्र संपेपर्यंत तसेच काही कारणास्तव पुढिल सत्राचे आदेश होईपर्यंत संबंधित शासकीय आश्रमशाळेला पुरवठा करावा लागेल.

8) भाजीपाला, अंडी, केळी व मटन/चिकण/फिश हे चांगले व ताज्या प्रतिचा दिलेल्या मेनुनुसार किंवा मुख्याध्यापक/ अधिक्षक यांच्या मागणी प्रमाणे पुरवठा करावा लागेल तसेच मटन हे बकऱ्याचे, चिकन हे बॉयलर कोंबडयांचे असावेत.
9) भाजीपाला व इतर साहित्य पुरवठा केल्यावर माल पोहोच केल्याचे पावती मुख्याध्यापक/ अधिक्षक यांचेकडुन प्राप्त करुन व देयकासोबत जोडुन देयक दर माह मुख्याध्यापक यांचे मार्फत या कार्यालयास सादर करावे लागेल.
10) भाजीपाला, अंडी, केळी व मटन/चिकण चा पुरवठा प्रत्यक्ष आश्रमशाळेच्या कोठीगृहापर्यंत पोहचता करावा लागेल.
11) भाजीपाला, अंडी, केळी व मटन/चिकण चा पुरवठा समाधानकारक नसल्यास पुरवठा आदेश रद्द करण्यात येईल. तसेच देयकाच्या रकमेवर 10 टक्के रक्कम दंड म्हणुन वसुल करण्यात येईल.
12) भाजीपाला व मटन/चिकण/फिशचा पुरवठा हा खंडीत किंवा मध्यंतरी सोडला व त्यामुळे विद्यार्थ्यांचे भोजनाची अडचण निर्माण झाल्यास त्यासाठी आपणावर योग्य ती कार्यवाही करण्यात येऊन आपले नाव काळ्या यादीत टाकण्यात येईल.
13) सदर निविदा कोणतेही कारण न दाखविता मंजुर किंवा नामंजुर करणे किंवा फेटाळुन लावणे इत्यादीबाबतचे अधिकार खरेदी समितीने राखुन ठेवलेले आहे. किंवा कोणत्याही क्षणी निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार सुध्दा खरेदी समितीने राखुन ठेवलेले आहेत.
14) पुरवठा धारकाने वेळेवर भाजीपाल्याचा पुरवठा न केल्यास संबंधित मुख्याध्यापकाने आवश्यक तेवढा भाजीपाला स्थानिक स्तरावरुन खरेदी करेल व सदर देयकाची रक्कम पुरवठा धारकाचे देयकातुन वसुल करेल.
15) निविदेत सादर केलेले भाजीपाला, अंडी, केळी व मटन/चिकण चे दर बाजारभावाशी मिळते जुळते आहे किंवा नाही याची तुलना करुन अवास्तव दर असल्यास बाजारभावाप्रमाणे दर मंजुर करण्यात येईल.
16) मागील पुरवठा धारकाचे बाबतीत त्यांचेकडील कामाचा आढावा घेऊन पुढिल निर्णय हा प्रकल्प अधिकारी, भामरागड यांनी राखुन ठेवलेला आहे.
17) नियमानुसार पुरवठा साहित्याच्या देयकातुन TDS तसेच इतर अनुषंगीक कर (असल्यास) कपात करण्यात येईल.
18) वरिष्ठ कार्यालयाकडुन ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन आदेश प्राप्त होऊन पुरवठा सुरु झाल्यास किंवा इतर ठिकाणाहुन सदर साहित्यांची व्यवस्था झाल्यास आपले आदेश आपोआप रद्द होईल याची नोंद घ्यावी.
19) सदर दरपत्रके शक्यतो **दिनांक** 14.01.2026 ला उघडण्यात येईल याची नोंद घ्यावी. दरपत्रके उघडण्याच्या दिवशी दरपत्रकधारक उपस्थित राहू शकतात. अन्यथा अनुपस्थितीत दरपत्रके उघडण्यात येईल. त्यानंतर कोणत्याही दरपत्रकधारकाचे आक्षेप किंवा हरकती आल्यास त्याचा विचार केल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.

(अमर राऊत, भा.प्र.से.)
प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
भामरागड जि.गडचिरोली